# आव्हानात्मक भुयारीकरण पूर्ण

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (एमएमआरसी) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मुंबई सेंट्रलपर्यंतचा २८वा भुयारीकरणाचा महत्त्वाचा टप्पा गुरुवारी पार पडला. एकाच टप्प्यात सलग चार किमी अंतराचे भुयारीकरण करणारे वैतरणा २ हे मेट्रो ३ मार्गिकेवरील पहिले टीबीएम ठरले.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गावर पॅकेज २मधील सीएसएमटी लॉचिंग शाफ्ट येथून फेब्रुवारी २०१८मध्ये वैतरणा २ या टीबीएम मशीनद्वारे भुयारीकरणाचे काम सुरू करण्यात आले होते. गुरुवारी, एकूण २७३० काँक्रीट रिंग्जचा वापर करत मेट्रो ३ मार्गावर सीएसएमटी ते बई सेंट्रलपर्यंत सर्वात जास्त अंतराचा पल्ला वैतरणा २ टीबीएमने गाठला.

'हे पॅकेज समुद्र किनाऱ्याला समांतर होते तसेच या मार्गावर अनेक जीर्ण व जुन्या इमारतींचा समावेश आहे. या भागात भूगर्भातील पाण्याची पातळी १-४ मीटर इतक्या जवळ अंतरावर होती त्यामुळे मार्गिकेतील भुयारीकरणाचा हा टप्पा सर्वात आव्हानात्मक होता. शिवाय करोनाच्या साथीमुळे हे काम अधिकच आव्हानात्मक झाले होते. मात्र, राज्य शासनाच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे कठोर पालन करून सुरक्षित वावराचे नियम पाळून हे काम पूर्ण केल्याचे एमएमआरसीचे व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल म्हणाले. कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेतील पॅकेजमध्ये सीएसएमटी, काळबादेवी, गिरगाव, ग्रँण्ट रोड व मुंबई सेंट्रल या पाच भूमिगत स्थानकांचा समावेश आहे.